अस्मिता मोगरा

दूरध्वनी: २८२२३६३२

को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड

(रजिस्टर नं.: बी. ओ. एम./ एच. एस. जी./ ५३३८, दि. २३-०३-७८)

कार्यालय: इमारत क्र. ३, श्री दत्त जगदंबा मंदिर मार्ग, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०००९३

जावक क्र.:o/MArch.-20/09 दिनांक: 12/3/2020.

**(सुचना फलकावर व वेब साईट वर प्रकाशित व सभासदांना वितरित)**

**<u>सभासद बंधू -- भगिनींनो.</u>**

**वि.स.सा.सभा दि: ०१.०३.२०२० रोजी पारित झालेले ठराव.**

रविवार दि: ०१.०३.२०२० रोजी पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत पारित झालेले ठराव आपणांस कळवित आहोत.

<u>विषय क्र</u>२ : **पुनर्विकास प्रकियेबाबत माहिती देणे.**

पुनर्विकास प्रकियेच्या वाटचालींचा आढावा घेऊन या प्रकियेअंतर्गत पुढील योजनेबाबत विचार विनिमय करून त्यावर निर्णय घेणे.

<u>ठराव १ :</u>

(I) आज, दि. १.३.२०२० रोजी आयोजित वि.स.सा.सभा, या आधीच्या सभांनी घेतलेले पुढील निर्णय पुनर्निश्चित करीत आहे.

१ : मे. पॅसिफिक कॉन्टूर व्हेंचर्स एल. एल पी. यांची संस्थेच्या पुनर्विकासासाठी विकासक म्हणून झालेली नियुक्ती.

२ : मे. पॅसिफिक कॉन्टूर व्हेंचर्स एल.एल.पी. यांच्या व्यवस्थापकीय बोर्डाचे पुनर्गठण (reconstitution of board)

३ : मे. तिवस्कर आणि असो. यांची संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी, प्रकल्प सल्लागार (PMC) म्हणून झालेली नियुक्ती.

(II)--

तसेच, संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पासंबंधी कार्यवाही करण्याचे व त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार ही वि.स.सा.सभा पुनर्विकास समितीस देत आहे. तसेच, विकासकांकडून प्राप्त अंतीम विकास करार पत्र (DA. Document) तपासून ते करार पत्र वि.स.सा.सभेत, कार्यकारिणीमार्फत, सादर करण्याचे अधिकार ही सभा पुनर्विकास समितीस देत आहे. आमसभेत बहुमताने स्विकारलेल्या व पारित

झालेल्या विकास करार पत्रावर (DA. Document) संस्थेतर्फे सह्या करण्याचे अधिकार ही सभा कार्यकार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांना देत आहे.

सूचक : श्री. किरण अक्कलकोटकर. अनुमोदक: श्री. नरेन्द्र सावंत.

ठराव मतास टाकला असता ठरावाच्या बाजूने : ७३, विरोधी : ०५, तटस्थ : ००. अश्या बहुमताने पारित झाला.

त्यानंतर अध्यक्षांनी ठराव बहुमताने पारित झाल्याचे जाहिर केले.

विषय क्र ३.इमारतींच्या दुरूस्तीबाबत :

ठराव २ :

स्ट्रक्चरल परिक्षण अहवालात इमारतींच्या दुरूस्ती कामासाठी सुचविलेल्या अंदाजे खर्चा वरील चर्चेनंतर, पुरेशा आर्थिक तरतुदीअभावी, ही सभा, इमारत दुरूस्तीचा निर्णय प्रलंबित ठेवीत आहे. तसेच, ताडपत्री व बांबू यांचे तात्पुरते छप्पर इमरतींवरील गच्च्यांवर बसविण्याच्या कामासाठीच्या दोन्ही निविदा नामंजूर करित आहे. त्याऐवजी इमारतींच्या सर्व गच्च्यांवर संस्थेच्या खर्चाने डांबर / डांबराच्या पट्या लावण्यास ही वि.स.सा.सभा (दि. १.३.२०२०) मंजूरी देत आहे.
तसेच, कार्यकारिणी व पुनर्विकास समिती यांना दुरूस्तीवर अतिरिक्त खर्च न करता, पुनर्विकास प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावा, असा निर्देष ही सभा देत आहे.

सूचक: श्री: सुरेश लोटणकर. अनुमोदक: श्री. श्रीकांत कानडे.

ठराव मतास टाकला असता ठरावाच्या बाजूने : ७५, विरोधी : ०४, तटस्थ : ००. अश्या बहुमताने पारित झाला.

त्यानंतर अध्यक्षांनी ठराव बहुमताने पारित झाल्याचे जाहिर केले.

विषय क्र: ५. सुरक्षा व्यवस्थेवरील वाढीव G.S.T. संदर्भातील निवेदन.

ठराव ३ :

सुरक्षा व्यवस्थेवर लागू झालेल्या GST कराच्या तरतुदीसाठी, प्रत्येक सभासदाकडून प्रतिमाहे रू: १०० इतकी अतिरिक्त रक्कम एप्रिल २०२० पासून त्रैमासिक बिलात सुरक्षा व्यवस्थेअंतर्गत दर्शवून, गोळा करण्यास ही वि.स.सा.सभा (दि १.३.२०२०) मंजूरी देत आहे.

सूचक: श्री: एम एन आर पिल्लई. अनुमोदक: श्रीम. स्वाती खानोलकर.

ठराव मतास टाकला असता ठरावाच्या बाजूने : ७८, विरोधी : ०१, तटस्थ : ००. अश्या बहुमताने पारित झाला.

त्यानंतर अध्यक्षांनी ठराव बहुमताने पारित झाल्याचे जाहिर केले.

Asmita Mogra Co-op. Hsg. Society

Secretary